**त्वरित:**

जा.क्र.माध्य-३/१०/[illegible]/पुवि
शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालय,
दि. 18 JUL 1989

प्रति,
मा. सचिव,
उत्कर्ष शिक्षण संस्था
मु. जो बरवंड ता. दौंड

विषय :- सन. १९८९-९० या शै. वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. एसएसएन/१०८९/२००५/मा.शि१ दि. २०-६-८९

महाशय;

शासनाचे संदर्भाधिन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या आपल्या शाळेत मराठी / ~~इंग्रजी~~ माध्यमातुन जून १९८९ पासून विना अनुदान / ~~प्रथम विना-अनुदान~~ तत्वावर "विशेष बाब" म्हणून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ.न. | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | कुरकुंभ. ता. दौंड | मराठी | ८वी | विना अनुदान तत्वावर |

सदर संस्थाना अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटीची पुर्तता करण्याच्या शर्तीवर नविन शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

अ) या नविन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) शासन निर्णय क्र. एसएसएन/१०८८/१६६९/न-माशि-१/दि. १०.२.८९ अन्वये विहीत केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२...

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिक-दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.च्या] फीच्या परताव्याची मागणी करता येणार नाही. अशा आशयाचे आपल्या अध्यक्षांचे सहीचे लेखी-हमी पत्र तयार करुन या कार्यालयास पाठवावे.

तरी वर नमूद केलेल्या अटीची पुर्तता करुन नवीन शाळा सुरु करण्या-बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षणाधिकारी, जि.प- पुणे यांचे मार्फत या कार्यालयास पाठवावा.

**स्थळप्रतीवर शि.उ.सं. यांची सही आहे**

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत.

१] मा. अवर, सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सादर.

२] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

३] शिक्षणाधिकारी, जि.प. पुणे यांना माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांना विनंती की, त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन शाळेने वर नमूद केलेल्या त्रुटी केलेल्या आहेत की, नाही याची खात्री करुन घ्यावी. तसेच शासनाचे संदर्भाधिन पत्रात परि.३ मध्ये नमूद केलेल्या १ ते ४ मुद्यांचा अहवाल १५ दिवसांचे आत या कार्यालयास पाठवावा.

110

जा.क्र. माध्य-३/13/मातु/९८-९९/पुवि/९८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 NOV 1998

प्रति,

मुख्याध्यापक,
फिरंगाई माता विद्या. कुरकुंभ, ता. दौंड
जि. पुणे

विषय :- अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळेतील जादा मंजूर केलेल्या तुकड्यांबाबत...
सन १९९८-९९

---

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेची पट पडताळणी केली असता इयत्ता ८वी या वर्गाच्या २री जादा तुकडीस मंजुरी देण्यात येत आहे. तसे आदेश शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांना अलाहिदा देण्यात आलेले आहेत. तरी आपण शिक्षण अधिकारी यांच्याशी हे पत्र मिळाले पासून चार दिवसांच्या आत संपर्क साधावा.

२. आपल्या शाळेचा शिक्षक/शिक्षकेतर संच सुधारित रित्या मंजूर करून घ्यावा. या तुकडीवर नवीन शिक्षक नेमण्यात येऊ नयेत. खात्याकडून अतिरिक्त शिक्षक पाठविण्यात येईल. सदर शिक्षकास हजर करून घेणे बंधनकारक आहे. नवीन शिक्षक नेमण्यापूर्वी शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांची मान्यता घेऊनच नेमणूक करावी. याबाबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेशी संपर्क साधून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

वाचा:- मा. शिक्षण समिती सभा दिनांक २४. ६. ९४ ठराव क्रं. २४

---

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्र. शिक्षण/प्राथ/२/८/ १३३ /९४
पुणे-१ दिनांक:- २.७.१९९४

आ दे श
======

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती व दौंड यांचेकडील जा. क्र. शिक्षण/वशी/३६४ दि. २. ३. ९४ नुसार माध्यमिक विद्यालय मौजे कुरकुंभ येथे इ. ५वी चे वर्ग सुरु करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी, शिफारशीसह प्रस्ताव सादर केला आहे.

तेंव्हा याकामी मा. शिक्षण समिती दि. २४. ६. ९४ ठराव क्र. २४ नुसार मान्यता दिली असल्याने खालील माध्यमिक विद्यालयास इ. ५वी चा वर्ग सुरु करण्यास ना हरकतप्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| अ. क्र. | माध्यमिक शाळेचे नांव व ठिकाण | नाहरक कोणत्या इयत्तेस मान्यता | मान्यतेचे शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|
| १] | फिरंगाईमाता विद्यालय कुरकुंभ ता. दौंड | ५वी वर्ग | जुन १९९४ |

सुभाष...
शिक्षणाधिकारी [प्राथ]
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता

प्रति,
१] शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. पुणे
२] गट शिक्षणाधिकारी पं. स. दौंड
३] मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय कुरकुंभ ता. दौंड

Head Master
Firangaimata Vidyalaya
Kurkumbh, Tal. Daund.
Dist. PUNE.

११७

जा.क्र. माध्य-३/93/मा/९८-९९/पुवि/९८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 NOV 1998

प्रति,

मुख्याध्यापक,

फिरंगाई माता विद्या. कुरकुंभ, ता. दौंड

विषय :- अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळेतील जादा मंजूर केलेल्या तुकडयांबाबत...
सन १९९८-९९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेची पट पडताळणी केली असता इयत्ता ---५वी--- या वर्गाच्या ---२री--- जादा तुकडीस मंजुरी देण्यात येत आहे. तसे आदेश शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद ---पुणे--- यांना अग्रेषित देण्यात आलेले आहेत. तरी आपण शिक्षण अधिकारी यांच्याशी हे पत्र मिळाले पासून चार दिवसांच्या आत संपर्क साधावा.

२. आपल्या शाळेचा शिक्षक/शिक्षकेतर संच सुधारित रित्या मंजूर करून घ्यावा. या तुकडयावर नवीन शिक्षक नेमण्यात येवू नयेत. खात्याकडून अतिरिक्त शिक्षक पाठविण्यात येईल. सदर शिक्षकास हजर करून घेणे बंधनकारक आहे. नवीन शिक्षक नेमण्यापूर्वी शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद ---पुणे--- यांची मान्यता घेऊनच नेमणूक करावी. याबाबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेशी संपर्क साधून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९६
पुणे, दि. १६/७/९६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~फिरंगाईमाता विद्यालय, कुरकुंभ~~
~~ता. दौंड, जि. पुणे.~~

**विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.**

सन १९९६-९७, ~~इ.६ वी~~,७वी,~~९वी~~, ~~१०वी~~.

आपल्या फिरंगाईमाता विद्यालय, ~~द्वारा~~ ~~संचलित~~ कुरकुंभ, ता. दौंड हया माध्यमिक शाळेतील ~~इ.८वी~~/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३/५वी ते७वी/परवानगी/जुवि/९४ दि.३०/४/९४ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ७ वी, ~~९ वी~~, ~~१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची ------ वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उप~~[illegible]~~शिक्षणाधिकारी, ~~शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे~~/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती दौंड यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

जा. क्र. माध्य-२/५वी ते ७वी/मान्यता/पी/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 30 SEP 1994

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद ———————— पुणे.

विषय:- इ. ५वी ते ७वीचे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करणेबाबत.
फिरंगाई माता माध्यमिक विद्यालय कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे.

संदर्भ :- आपले प. क्र. शिक्षणा/माध्य/ह-४/५वी /९४-९५ दि २/८/९४.

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, ~~सन १९~~ ———— या शैक्षणिक वर्षापासुन परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५वी ते ७वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्र. एसएसएन/१०८५/२३४८५[२४४एन] माशि-१, दि. २९/१/८६ व दि. २०/१२/८८ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांनी प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५वी ते ~~७वीच्या~~ वर्गांना जून १९९४ या शैक्षणिक वर्षापासुन विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी:- १]इ. ५वी ते ७वी च्या वर्गांची परवानगी ही विनाअनुदान तत्वावर राहील.
२]मा. शा. संहिता नियम ३. २ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
३]तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील. ४] [illegible] पूर्व परवानगी शिवाय इ. ५वी ते ७वी च्या वर्गात ५० पे अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे तसेच आपण सदर शाळेत १५ दिवसाचे आंत भेट देऊन इ. ५वी ते ७वी च्या सध्या सुरु असलेल्या वर्गांची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

(सही)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत-
१]मा. अवर सचिव, शिक्षण सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सविनय सादर.
२] मुख्याध्यापक, फिरंगाई माता माध्यमिक विद्यालय, ~~कुरकुंभ~~ कुरकुंभ. ता. दौंड, जि. पुणे.

यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-३/०४-०५
दिनांक : २८-१०-२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्री फिरंगाई माता विद्यालय,
कुरकुंभ ता. दौंड,
जि. पुणे.

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत. ......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा.शा. अ-१००३/[३८०/२००३] मा. शि.-१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९. २००४ चे पत्र

~~३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक दिनांक~~

~~चे पत्र.~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन २००१-०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यात आलेली ~~प्रत्यक्ष~~ पाहणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करून आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकड्या त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्या शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० वी | २ री | 2003-04 | नैस. वाढीव | विना अनु |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

उपरोक्त तुकड्या पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सूत्र किंवा जेव्हा त्या तुकड्या अनुदानास पात्र ठरून अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकड्यानुसार सेवकसंच मान्य करून घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करून द्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

अत्यंत महत्त्वाचे

यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद, [शिक्षण विभाग]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-५/वा. तु./
१९९०-९१, पुणे-१.

दिनांक:- ३१/८/१९९०

प्रति,

मा. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~फिरंगाई माता विद्यालय कुरकुंभ,~~ (विना अनुदानित)
~~ता. दौंड, जि. पुणे.~~

विषय:- सन-१९९०-९१ मध्ये मान्यताप्राप्त माध्यमिक शाळातील वर्गवार तुकडयांना मंजुरीबाबत...

महोदय, /महोदया,

मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे-१ यांचेकडील पत्र क्र. अमाशा/१०९०/जा.त./१५क/दिनांक-१२-६-१९९० अन्वये या कार्यालयाचे जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-५/शि. वि./दिनांक ४. ३. ९० अन्वये सन १९८९-९० मधील डिसेंबर, ८९ ची तुकडी त्यांच्या पटसंख्या व हजर सरासरी बाबतची माहिती "अ" व "ब" प्रपत्रात मागविण्यात आलेली होती. त्यांची छाननी करण्यांत आली. तसेच ९०-९१ करिता पुणे जिल्ह्यातील मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे-१ यांनी मंजूर केलेल्या तुकडयांची संख्या व आर्थिक तरतुद विचारात घेऊन आपले मंजुरी बाबतची मान्यता देणेत येत आहे. शाळेस खाली नमूद केलेप्रमाणे ९०-९१ सालाकरिता तुकडी [ ]मंजूर करण्यांत येत आहे.

[१] सन ८९-९० मध्ये आपले शाळेस मंजूर असलेल्या तुकडयांची संख्या व विद्यार्थी संख्या लक्षांत घेता सन ९०-९१ करिता इयत्ता[ ]ची तुकडी कमी करुन इयत्ता[ ] ची तुकडी देणेत येत आहे.

[२] इयत्ता ५वी ते ७वी या वर्गाच्या १९८९-९० मध्ये मंजूर केलेल्या तुकडयांच्या प्रमाणातच विहित संख्येनुसार दाखल करु नयेत, सदर विद्यार्थी जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, नगरपालिका या शाळेत वाढविणे कार्यवाही करण्यांत यावी.

[३] सन ८७-८८, ८८-८९, ८९-९० मध्ये आपले शाळेस नव्याने मान्यता मिळाल्याने सन ९०-९१ करिता नैसर्गिक वाढ म्हणुन मान्यता...चे वर्ग सुरु करण्यांत मान्यता देण्यात येत आहे.

[४] सन ८९-९० मध्ये मंजूर झालेल्या तुकडयांपैकी सन ९०-९१ करिता इयत्ता[ ]ची तुकडी कमी करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | सन | इ. ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [१] | १९८९-९०तुकडया= | - | - | - | 1 | - | - | 1 |
| [२] | १९९०-९१तुकडया= | - | - | - | 1 | + 1 | - | 1+1 |

मंजूर तुकडयांच्या व्यतिरिक्त जादा तुकडया कोणत्याही परिस्थितीत चालू ठेवू नयेत. मंजूर नसलेल्या तुकडयांचे संबंधित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचा पगारात तसे नामंजूर तुकडयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

आपला विश्वासू,

[signature]

[शिक्षणाधिकारी [माध्यमिक]],
जिल्हा परिषद, पुणे-१.

प्रत:- अधीक्षक, वेतन व भ. नि. नि. पथक,
पुणे-१.